# भारतीय संविधान निर्मितीचे कार्य – एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. प्रशांत वामनराव खेडकर**
राज्यशास्त्र विभाग
रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर

स्वतंत्र भारताचे संविधान हे दूरदृष्टीच्या अभ्यासू व व्यासंगी अशा लोकप्रतिनिधींकडून, घटना समितीत लोकशाही मार्गाने चर्चा करून जनतेने सुचविलेल्या सूचना मान्य करून तयार करण्यात आलेले आहे. भारताच्या इतिसाहात ज्या अपूर्व, अनन्यसाधारण घटना घडल्या त्यापैकी संविधान निर्मितीची घटना महत्वपूर्ण घटना होय. भारतीय संविधान निर्मीतीचे कार्य जरी २ वर्ष, ११ महिने, १८ दिवस या कालखंडामध्ये पूर्ण झाले असले तरी या संविधान निर्मितीला व्यापक अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. प्रस्तुत शोध निबंधामध्ये संविधान निर्मीतीची ऐतिहासिक पार्श्वभूमी व राज्यघटना निर्मितीचे कार्य मांडण्याचा प्रमुख उद्देश आहे. या करिता इंटनेटचा व संबधित ग्रंथाचा वापर करून प्रस्तुत शोध निबंध तयार करण्यात आलेला आहे.

भारतीय संविधानाच्या इतिहासाला १७७३ साली संमत झालेल्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या रेग्युरेटिंग ॲक्टने प्रारंभ होतो. १८५७ मध्ये झालेल्या उठावानंतर भारतातील ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार संपुष्टात आला आणि भारताचा शासनकारभार करण्याची जबाबदारी ब्रिटिश पार्लमेंटने स्वीकारली. ब्रिटिश मंत्रिमंडळाचा सदस्य असलेला एक मंत्री –भारतमंत्री त्यांच्यामार्फत भारतातील राज्यकारभारावर नियंत्रण ठवले जाऊ लागले. त्या मंत्रिमंडळातील बहुसंख्य सभासद भारतात दहा वर्ष सनदी सेवेत काम केलेले आणि भारत सोडून दहा वर्षाचा कालावधी पूर्ण केलेले नसावेत असा संकेत होता. १८५८ च्या कादद्यानुसार भारतातील कारभार विषयक अहवाल भारतमंत्र्याने पार्लमेंटला दरवर्षी सादर करावे लागत होते. अशाप्रकारे ब्रिटिश राजवटीचा भारतावर प्रत्यक्ष राज्यकारभार सुरू झाला. त्याकरिता प्रत्यक्ष प्रतीनिधी म्हणून व्हाइसरॉयला अधिकार प्राप्त झाले. त्याचे व्हिक्टोरीया राणीने एक जाहीरनामा काढला त्या नुसार संस्थानिकासमोर केलेल्या तहाचे पालन होईल, त्यांचे हक्क दर्जा, अधिकार अबाधित राखला जाईल. सर्व प्रजाजनांना वंश जात, धर्म पंथ यामुळे भेद न करता शिक्षण व योग्यतेनुसार शासनात नोकऱ्या दिल्या जातील. प्रत्येकाला धार्मिक आचरणाची मुभा राहील. त्यामध्ये सरकारद्वारा कोणत्याही प्रकारची ढवळाढवळ केली जाणार नाही. भारतातील पारंपरिक रूढी, प्रथा व परंपरा यांचा आदर केला जाईल. इंग्रज सरकारद्वारे असे आश्वासन देण्यात आले की सरकारी आदेशाचा उपयोग जनतेच्या हिताकरिता केल्या जाईल. १८६१ च्या कायद्याने कौन्सीलची निर्मिती करण्यात आली. या कायद्यानुसार सुप्रीम कॉन्सीलमध्ये कायद्याची निर्मिती करण्याकरिता कमीत कमी ६ आणि जास्तीत जास्त १२ असे सभासदाची नेमणूक करावी ही म्हणजे एकप्रकारे भारताच्या कायदेमंडळाची सुरूवात झाली होती. या कायदेमंडळातील सभासदांना केवळ कायदे तयार करण्याचेच अधिकार होते, कॉन्सीलमध्ये प्रश्न विचारणे, ठराव मांडणे, अंदाजपत्रकावर चर्चा करणे इत्यादी अधिकार त्यांना नव्हते.

एकोणीसाव्या शतकामध्ये जी संविधानिक प्रगती झाली त्यामध्ये त्या काळात दळणवळणाच्या साधनांमध्ये सुधारणा होऊन त्यामध्ये वाढ झाली. लॉर्ड मेकॉले यांच्या शिफारशीनुसार भारतामध्ये सनदी

नौकरीतील प्रवेशासाठी स्पर्धात्मक परीक्षेची सुरूवात त्याचप्रमाणे शिक्षणामध्ये इंग्रजी शिक्षणाची सुरूवात करण्यात आली. याचा परिणाम असा झाला की भारतीयामध्ये राष्ट्रीयत्वाचा प्रसार मोठया प्रमाणात होऊ लागला. परिणामी राष्ट्रवादाची चळवळ मोठया प्रमाणात उभी झाली. याच काळामध्ये भारतात हिन्दू व मुस्लिम यांचे दोन भिन्न गट तयार झाले. १९०६ मध्ये व्हाईसरॉय लॉर्डमिंटो यांना आगाखान यांच्या नेतृत्वाखाली मुस्लीमांचे स्वतंत्र एक शिष्टमंडळ भेटले. त्यांनी इंग्रजासमोर मुस्लिमाकरिता स्वतंत्र मतदारसंघ असावे अशी मागणी केली. १९०९ मध्ये कॉन्सील ॲक्ट नुसार गव्हर्नर जनरलच्या कायदेमंडळात निवडणुकीचे तंत्र पहिल्या वेळेस मान्य करण्यात आले. आणि त्याच बरोबर प्रांताच्या कायदेमंडळातील निर्वाचित सभासदाची संख्या जास्त करण्यात आली. त्यामध्ये जातीवर आधारित प्रतिनिधीत्व स्वीकारण्यात आले.

१९११ साली दिल्ली या ठिकाणी बादशहा पंचमजॉर्ज यांच्या राज्यरोहणाच्या निमित्त दरबार भरविण्यात आला. या प्रसंगी बंगालची फाळणी रद्द करण्यात आली आणि भारताची राजधानी कलकत्त्याऐवजी दिल्ली राहील असे स्पष्ट करण्यात आले. हा निर्णय म्हणजे ब्रिटिश प्रणालीचा कमकुवतपणा नसून स्थैर्य आणि मजबूती निर्माण करण्याकरिता घेण्यात आलेला एक निर्णय होता. या काळातच पहिले महायुद्ध सुरू झाले होते त्याचा परिणाम असा झाला की भारतामध्ये राजकीय अस्थिरता निर्माण होऊ लागली. १९१६ ला राष्ट्रसभा आणि मुस्लीम लिग यांच्यामध्ये एक करार झाला. त्या करारानुसार मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघ मान्य करण्यात आले. या निर्णयामुळे मुस्लिमांचे सहकार्य आपल्याला स्वराज्य निर्मितीकरिता मिळेल असे राष्ट्रसभेतील काही पुढाऱ्यांना वाटत होते. याच काळात ॲनी बेझंट यांनी ऑयर्लंडच्या धर्तीवर भारतात होमरूल चळवळ सुरू केली. त्याला लोकमान्य टिळकांनी पाठिंबा दिला. युद्ध विराम झाल्यानंतर इंग्रज पुन्हा जुन्याच धोरणानुसार करतील अशी धारणा लोकमान्य टिळकांची होती म्हणून त्यांनी भारतीय जनतेमध्ये इंग्रजाविषयी असंतोष निर्माण करण्याला सुरूवात केली. याच काळात जालीयनवाला बाग हत्याकांडात शेकडो निरअपराध भारतीयांची हत्या करण्यात आली. १९१९ च्या रॉलेट कायद्यामुळे इंग्रजाच्या दडपशाही धोरणाचा मोठया प्रमाणात विरोध करण्यात आला. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाची चळवळ आणि खिलापत चळवळ या शस्त्राने इंग्रजांचा प्रतिकार केला. १९१९ च्या इंग्रजांच्या कायद्याने भारतातील संविधानिक प्रगतीला संसदीय लोकशाहीची दिशा प्राप्त करून दिली. या कायद्यानुसार प्रातांना स्वायत्तता देण्यात आली. या कायद्यामध्ये भारतामध्ये द्विगृही कायदेमंडळाची तरतुद करण्यात आली.

मॉटफर्ड सुधारणा भारतात सुरू झाल्यापासून महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली त्यामध्ये बदल करण्याकरिता मोठया प्रमाणात विरोध करण्यात आला होता. भारतीय जनतेतील असंतोषामुळे १९२७ मध्ये इंग्रज सरकारने सायमन आयोगाची घोषणा केली. यामध्ये एकही भारतीय सदस्य नसल्यामुळे कामकाजावर बहिष्कार टाकण्यात आला. त्याचा परिणाम सायमन कमिशन बरोबर राष्ट्रीय सभेने पुकारलेल्या बहिष्कारामुळे भारतातील पुढाऱ्यांनी सर्वसंमतीने एक घटना बनवावी असे हुजुर पक्षाकडून भारतीयांना आव्हान करण्यात आले. हे आव्हान स्वीकारून सर्व पक्षाच्या परिषदेने पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली या समीतीने जो अहवाल तयार केला तो नेहरू रिपोर्ट म्हणून प्रसिद्ध आहे.

स्टॅफर्ड क्रिप्स यांनी भारतामध्ये मार्च १९४२ ला पुढाऱ्याशी बोलणी करून क्रिप्स योजना तयार केली. यानुसार युद्धानंतर भरताचे स्थान इतर वसाहतीसारखे राहिल आणि ब्रिटिश राष्ट्रकुलातून फुटून

निघण्याचे स्वातंत्र्य भारताला राहील. भारताचे संविधान तयार करण्याचे काम युद्ध समाप्तीनंतर विधिमंडळाच्या सभासदांकडून संविधान समिती निवड करून करता येईल. हे सविधान भारतातील एखाद्या प्रांताला मान्य नसल्यास त्याला भारतीय संघराज्यातून फुटून स्वतंत्रपणे ब्रिटनबरोबर संबंध ठेवता येतील. या क्रिप्स योजनेमध्ये कॉंग्रेसच्या मागणीचा आशय व अप्रत्यक्षपणे मुस्लीम लिगच्या मागणीचा आशय मान्य करण्यात आला होता. परंतु तात्पुरत्या व्यवस्थेच्या आशयाबाबत एकमत न झाल्यामुळेच क्रिप्स शिष्टाई असफल ठरली. त्यानंतर पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांनी पार्लेमेंटमध्ये भारतीयांचा स्वयंनिर्णयाचा व स्वत:ची राज्यघटना निर्मितीचा अधिकार आम्हाला मान्य आहे असे निवेदन १७ मार्च १९४६ मध्ये दिले हे जरी खरे असले तरी बहुसंख्याकांची प्रगती अल्पसंख्याकांनी रोखून धरणे आम्हास मान्य नाही. त्याकरिता एक त्रिमंत्रीमंडळ भारताला पाठविण्यात येत असल्याची घोषणा केली. या तीन मंत्र्यांनी भारतातील निरनिराळया पक्ष्याच्या पुढाऱ्याशी चर्चा केली. सिमला येथे कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांच्या प्रमुख पुढाऱ्याशी चर्चा केली त्यामध्ये मतैक्य होत नसल्याचे निर्दशनास आले त्यानंतर १६ मे १९४६ रोजी या तीन मंत्र्यांनी कॅबिनेट योजना जाहिर केली.

कॅबिनेट मिशन योजनेनुसार मताधिकाराद्वारे संविधान सभेची निर्मिती करणे संभव नाही त्यामुळे प्रांताच्या विधानसभेतील सदस्याद्वारे घटना समीतीच्या सदस्याची निवड करण्यात यावी असे स्पष्ट करण्यात आले. त्यानुसार जुलै १९४६ मध्ये संविधान सभेच्या निवडणुका घेण्यात आल्या. त्यामध्ये एकूण ३८९ सदस्य संख्या होती. त्यापैकी प्रांताकरिता निर्धारित सदस्य २९६ सदस्याची निवड करण्यात आली. त्यामध्ये राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाला २०८ व मुस्लीम लिग पक्षाला ७३ आणि राहिलेल्या पक्षाला एक एक सदस्य प्राप्त झाले. अपक्ष आठ उमेदवार विजयी झाले. मुस्लीम लिगने या पराभवामुळे संविधान सभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे बॅरीस्टर जीना यांनी कॅबीनेट मिशन योजनेला असलेला मुस्लीम लिगचा पाठिंबा काढून घेत असल्याचे जाहिर केले. या पेचप्रसंगामुळे स्वतंत्र पाकिस्तानची मागणी पुढे आली. पुढे मांउटबॅटन योजनेनुसार भारत व पाकिस्तान असे दोन स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात आले.

संविधान सभेच्या कामकाजाचे विश्लेषण दोन भागामध्ये प्रामुख्याने करता येते. एक स्वांतंत्र्यपूर्व काळातील कार्य आणि दुसरे स्वातंत्र्यप्राप्ती नंतरचे कार्य. संविधान समितीने संविधान निर्मितीचे कार्य सायीचे व्हावे म्हणून विविध प्रमुख विषयाच्या १२ समित्या स्थापन केल्या त्यामध्ये मसुदा समिती ही सर्वात महत्वपूर्ण समिती होती. या समितीमध्ये अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एन.गोपालस्वामी अय्यंगर, अल्लादी कृष्ण स्वामी अय्यर, कन्हैयालाल मुंन्शी, मोहम्मद सादुल्ला, बी.एल. मित्तर, डी.पी. खेतान असे एकूण सात सभासद होते. या सात सभासदामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य हे महत्वपूर्ण होते.

**संविधान समितीचे कार्य –**

**१. स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्य.**

स्वातंत्र्यपूर्व काळात संविधान सभेचे एकूण चार अधिवेशने झालीत.

**पहिले अधिवेशन –**

संविधान सभेचे पहिले अधिवेशन ९ डिसेंबर १९४६ ला सुरू झाले व २३ डिसेंबरला संपले. सभेचे अस्थायी अध्यक्ष डॉ. सचिनानंद सिन्हा होते. या बैठकीमध्ये ११ डिसेंबरला डॉ. राजेंद्र प्रसाद यांची संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. या सभेला २०७ सभासद उपस्थित होते. मुस्लिम लिगच्या सर्व सभासदांनी बहिष्कार टाकला होता. या अधिवेशनामध्ये जवाहरलाल नेहरू यांनी उद्दिष्टांचा

ISSN 2455-4375

ठराव मांडला. भारतातील सर्व नागरिकांच्या किमान प्राथमिक गरजाची पूर्तता होईल, प्रत्येकाला आपल्या क्षमतेनुसार विकासाची संधी प्राप्त होईल, रूढी, परंपरांच्या जाचक बंधनातून समाज मुक्त होईल, धर्माधिर्मात वाद होणार नाही, अंधश्रध्दा समाप्त होईल. नवीन अर्थव्यवस्था प्रस्तापीत होईल व समाज परिवर्तन घडून आणण्यासाठी संविधान निर्मिती करीत आहोत. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी राज्यव्यवस्था निवडणे हे संविधान सभेपुढील एक मोठे आव्हान आहे. या ठरावानुसार उद्देशपत्रिकेचे स्वरूप ठरविण्यात आले.

**दुसरे अधिवेशन —**

२० जानेवारी ते २५ जानेवारी १९४७ या काळात संविधान सभेचे दुसरे अधिवेशन झाले. पहिल्या अधिवेशनात मांडलेल्या उद्दिष्टांचा ठराव या अधिवेशनात संमत करण्यात आला. विविध समित्यांची नेमणूक या अधिवेशनामध्ये करण्यात आली. त्यामध्ये मसुदा समिती, संचालन समिती, कार्यपद्धती नियम समिती, वित्त व स्टाफ समिती, राष्ट्रध्वज संबधी तदर्थ समिती, संघराज्य संविधान समिती, संघराज्य अधिकार समिती, प्रांतिक संविधान समिती, मूलभूत अधिकार व अल्पसंख्याक हक्क समिती, झेंडा समिती, सुकाणू समिती, मूलभूत अधिकार उपसमिती, अल्पसंख्यांक हक्क उपसमिती, वित व स्टाफ उपसमिती आदिचा समावेश होता.

**तिसरे अधिवेशन —**

२२ एप्रिल ते २ मे १९४७ या कालावधीत तिसरे अधिवेशन झाले. संविधान समीतीच्या प्रत्यक्ष कामाला या अधिवेशनात सुरूवात झाली. संघशासन समिती, प्रांत समिती, अल्पसंख्याक समिती या समित्याचे अहवाल सभेत सादर करण्यात आले.

**चौथे अधिवेशन —**

१४ जुलै ते ३१ जुलै १९४७ या काळात चौथे अधिवेशन झाले. या अधिवेशनामध्ये विविध समित्यांच्या अहवालावर चर्चा करण्यात आली. या अधिवेशनामध्ये भारताचा राष्ट्रध्वज मान्य करण्यात आला.

**२. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळातील संविधान सभेचे कार्य —**

**पाचवे अधिवेशन —**

या अधिवेशनामध्ये २९ ऑगष्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीची निवड करण्यात आली.

**सहावे अधिवेशन —**

या अधिवेशनामध्ये दि २६ फेब्रुवारी १९४८ ला मसुदा समीतीने संविधानाचा आराखडा सादर केला. या मसुद्याबाबत संविधान सभेच्या इतर सभासदांना विचार करता यावा, त्यांना त्यातील विषयावर अभ्यास करता यावा तसेच जतमताचाही अंदाज घेतला जावा यासाठी आठ महिण्याचा अवधी ठरविण्यात आला.

**सातवे अधिवेशन —**

या अधिवेशनात संविधानाच्या मसुद्यावर चर्चा झाला. सभासदांनी विविध कलम व त्या अंतर्गत तरतुदी यावर आपआपली मते मांडली. हे अधिवेशन ४ नोव्हेंबर ते १३ डिसेंबर व २७ डिसेंबर ते ८ जानेवारी १९४९ पर्यत दोन टप्प्यात झाले.

**पुढील चार अधिवेशने –**

९ डिसेंबर १९४६ पासून २६ नोव्हेबर १९४९ पर्यत एकूण ११ अधिवेशने झालीत. पहिल्या सहा—सात अधिवेशनात संविधानाची उद्दिष्टये, मूलभूत हक्क, संघराज्य इत्यादी विषयावर कामकाज होवून उर्वरित पाच अधिवेशनामध्ये संविधानाचा मसुदा तयार करण्याचे काम झाले. यासाठी मसुदा समितीने तयार केलेला मसुदा संविधान सभेत चर्चा व मान्यतेसाठी सादर करण्यात आला. मसुद्यावरील चर्चेत सभागृहात २४७३ दुरूस्त्या मांडून त्यावर चर्चा करण्यात आली. त्यांनतर मसुदा मंजूर करण्यात आला. त्यावर संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी स्वाक्षरी केली. २६ नोंव्हेबर १९४९ रोजी भारतीय संविधान मंजूर करण्यात येऊन पुढे २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी करण्याचे निश्चित करण्यात आले. सुरूवातीला राज्यघटनेची कोणतीही छापील प्रत उपलब्ध नव्हती. दिल्लीच्या प्रेमबिहारी नारायण रायजादा सक्सेना यांनी संविधानाचे इंग्रजी आणि वसंत वैद्‌य यांनी हिंदी हस्तलिखित तयार करण्याची जबाबदारी स्वीकारली. प्रेमबिहारी रायजादांनी अत्यंत सुंदर अक्षरात वळणदार शैलीत राज्यघटनेचे २२ भाग, ३९५ कलमे आणि ८ परिशिष्टे यांचे कॅलिग्राफी काम केले. त्यासाठी त्यांना २५४ पेन आणि ३०३ निब लागल्या. त्यांनी लिहीलेल्या प्रास्ताविकेला बिओहर राममनोहर सिन्हा यांनी अंत्यत उत्कृष्ट नक्षीकाम शांतिनिकेतनमधिल कलाकारांनी चौकटीचे नक्षीकाम केले.

**इतर देशाच्या संविधानातून भारतीय संविधानात घेतलेल्या बाबी –**

भारतीय शासन कायदा १९३५ मधून संघराज्यीय योजना, न्यायव्यवस्था, लोकसेवा आयोग, आणिबाणीच्या तरतुदी, राज्यपालाचे पद, प्रशासकीय तपशील आदीचा समावेश करण्यात आला. ब्रिटीश राज्यघटने मधून संसदीय शासन व्यवस्था, कॅबिनेट व्यवस्था, द्विगृही संसद, कायद्याचे राज्य, एकेरी नागरिकत्व, एकेरी न्यायव्यवस्था, संसदीय विशेषाधिकार, कायद्यासमोर समानता इत्यादी बाबीचा समावेश करण्यात आला. अमेरिकेच्या संविधानातून कायद्यापुढे समान संरक्षण, उपराष्ट्रपती, मूलभूत अधिकार, संघराज्य, न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य, न्यायालयीन पुनर्विलोकन, राष्ट्रपतींवरील महाभियोग पद्धत, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशास पदावरून दूर करण्याची पद्धती, संविधानाच्या प्रस्तावनेची भाषा आदी बाबीचा समावेश करण्यात आला. कॅनडाच्या संविधानामधून प्रभावी केंद्रसत्ता असलेले संघराज्य, केंद्राकडे शेषाधिकार, केंद्रातर्फे राज्यपालाची नेमणूक, सर्वोच्च न्यायालयाचे सल्लागार अधिकार क्षेत्र, केंद्रसूची, राज्यसूची आदी बाबीचा समावेश भारतीय संविधानात करण्यात आला.

आयर्लंडच्या संविधानामधून राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्वे, राष्ट्रपतींची निवडणूक पद्धत, राज्यसभेवरील काही सदस्यांचे नामनिर्देश २५० पैकी १२ सदस्य आदी बाबींचा समावेश भारतीय संविधानात करण्यात आला. ऑस्टेलियाच्या संविधानामधून समवर्ती सूची , व्यापार व वाणिज्य व्यवहारांचे स्वातंत्र्य, संसदेच्या दोन्ही गृहांचे संयुक्त अधिवेशन, संसदिय सदस्याचे विशेषाधिकार आदी बाबीचा समावेश करण्यात आला. जर्मनीच्या संविधानामधून आणिबाणी दरम्यान मूलभूत हक्क स्थगीत होणे आदी बाबीचा समावेश करण्यात आला तर जमानच्या संविधानातून कायद्याने प्रस्तावित पद्धत, सोव्हीएत रशियाच्या संविधानातून मूलभूत कर्तव्य आणि सरनाम्यातील सामाजिक आर्थिक व राजकीय न्यायाचे आदर्श, दक्षिण आफ्रिकेच्या संविधानामधून घटनादुरूस्तीची पद्धती, राज्यसभेच्या सदस्यांची निवडणूक आदी बाबीचा समावेश भारतीय संविधानात करण्यात आला. परंतु एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे इतर देशाच्या संविधानातून अशाच गोष्टीचा समावेश आपल्या संविधानात करण्यात आला की त्या योग्य आहेत आणि आपल्या इथे

त्याची आवश्यकता आहे. हया तरतूदी स्वीकारीत असतांना जशाच्या तशा न स्वीकारता ज्याची गरज आहे त्याचे घेण्यात आल्या अन्यथा नाकारण्यात आल्या.

अशाप्रकारे भारतीय संविधान निर्मितीचे कार्य ९ डिसेंबर १९४६ रोजी प्रारंभ होऊन ते २६ नोव्हेंबर १९४९ रोजी पूर्ण झाले. एकुण २ वर्ष ११ महिने १८ दिवस संविधान निर्मीतीचे कामकाज चालले. एकूण अकरा अधिवेशने झालीत. या कालखंडात प्रत्यक्ष कामकाज १६५ दिवस चालले. त्यातील ११४ दिवस संविधानाच्या मसूद्याचा विचार करण्यासाठी खर्च झालीत. संविधानाच्या मसूद्यावर जनतेकडून ७६३५ सूचना आल्या त्यापैकी ५४७३ सूचनांवर चर्चा झाली. सर्व कामकाजासाठी एकूण ६३ लाख ९६ हजार ७२९ रूपये खर्च झाली.

**निष्कर्ष –**

भारतीय संविधान निर्मिती जरी विशिष्ट काळात झाली असली तरी त्याला फारमोठी पार्श्वभूमी आहे. भारतीय संविधान निर्मिती मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्वपूर्ण कार्य आहे. भारतीय संविधान हे लोकशाही मार्गाने बनविण्यात आले. संविधान तयार करीत असतांना संविधान समीतीच्या सभासदाचे मत नोंदविण्यात आले एवढेच नव्हे तर भारतीय जनतेद्वारे ज्या सूचना देण्यात आल्या होत्या त्यावर सुद्धा चर्चा करून विचार करण्यात आला. संविधान तयार करतांना इतर देशाच्या संविधानामधून ज्या बाबी भारताला आवश्यक आहेत अशा बाबीचा समावेश करण्यात आलेला दिसून येतो. भारतीय संविधान निर्माण करीत असतांना भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय बाबीचा विचार करून अनेक बाबींचा समावेश केलेला दिसून येतो. भारतीय संविधान निर्मीत करीत असतांना भातातील भविष्याचा वेध घेतला असल्याचे दिसून येते.

**संदर्भ सूची–**

१. महाराष्ट्र टाइम्स, भारतीय संविधानाची निर्मिती, २६ नोंव्हबर २०१८.
२. एम. लक्ष्मीकांत, इंडियन पॉलीटी फॉर सिव्हील सर्व्हिसेस एक्झमिनेशन, तृतिय आवृत्ती, नवी दिल्ली, २०११.
३. Biswas, A.R. Indian Constitutional and Legel History, Calcutta, 1971
४. गुप्ते, भा. म. हिंदी राज्यघटना, पुणे, १९५१
५. कसबे रावसाहेब, डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, तृतीय आवृत्ती२००१, सुगावा प्रकाशन ५६२, सदाशिव पेठ पुणे.